# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## स्थानिक संस्था कर विभाग

वाचा :- महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.०८/०१/२०१६.

**स्थानिक स्वराज्य संस्था कर निर्धारणे संदर्भात सल्लागार (निवृत्त विक्रीकर अधिकारी) यांची तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने नियुक्ती करणेकामी अर्ज मागविणेबाबतची जाहीर सूचना.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाकडे नोंदणीकृत व्यापा-यांनी दाखल केलेल्या वार्षिक विवरणपत्रांच्या आधारे स्थानिक संस्था कर नियम २०१० चे नियम ३३ नुसार कर निर्धारण करणेकरीता कर आकारणी, वस्तुंचे मुल्यांकन इत्यादी कर विषयक कामाचा अनुभव असलेल्या सेवा निवृत्त विक्रीकर अधिकारी (निरिक्षक) किंवा त्यापेक्षा उच्च पदावर काम केलेल्या १० विक्रीकर अधिका-यांची सहा महिन्याकरीता ठोक मानधनावर विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक करावयाची आहे. त्याअनुषंगाने दिनांक ३१/०३/२०१७ ते दिनांक ०८/०४/२०१७ या कालावधीत अहर्ताधारक इच्छूक उमेदवार यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक उमेदवार यांनी आपला स्वयंस्पष्ट अर्ज शैक्षणिक पात्रतेचे कागदपत्रे, विक्रीकर विभागाकडील नियुक्ती तसेच लास्ट पे-सर्टीफिकेट, माहे फेब्रुवारी,२०१७ करीता प्राप्त निवृत्ती वेतनाच्या प्रतीसह भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, स्थानिक संस्था कर विभाग, ३ रा मजला, जुनी प्रशासकिय इमारत, काप आळी, भिवंडी-४२१३०८ जि.ठाणे येथे दिनांक ०८/०४/२०१७ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) सादर करावेत. उशिरा प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही. सदर नियुक्तीचे सर्व अधिकार मा.आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांना राहतील, याकामी सविस्तर माहिती करीता उपआयुक्त (कर) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांचेशी संपर्क साधावा.

३१/०३/१७

मा.आयुक्त सो.
यांच्या मान्यतेने

(दिपक दे.कुरळेकर)
उप-आयुक्त (स्था.सं.कर)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका